# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** वाशिम

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0803 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/10/2023 21:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 06/10/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/10/2023
**Time From (वेळेपासून):** 14:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/10/2023 **Time (वेळ):** 20:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 061

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/10/2023 20:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप अभियंता यांत्रिकी उच्चालक ,उभारणी वदुरुस्ती,उपविभाग वाशिम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.गौरव एकनाथराव खोंड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा,चैतन्य कलनी,जुना बायपासरोड,अमरावती,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा,चैतन्य कलनी,जुना बायपासरोड,अमरावती,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय विश्वनाथ कोल्हे | | | 1. रा प्लट नं30 नविन आयुडीपी ,सिव्हील लाईन वाशिम,वाशिम, वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ला.प्र.वि.वाशिम
दिनांक:-30.10.2023

श्री.गौरव एकनाथराव खोंड वय 33 वर्षे,व्यवसाय शासकिय कंत्राटदार स्वराज्य इंजिनिअर्स अमरावती, रा,चैतन्य कॉलनी,जुना बायपास रोड अमरावती, मो.नं. 9421946737 (जिओ)

मी समक्ष तक्रार लिहुन देतो कि, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहतो.माझे शिक्षण बि.ई मॅकेनिकल इंजिनिअरींग पर्यंत झाले आहे. मी शासकिय कंत्राटदार असुन माझी स्वराज्य इंजिनिअर्स अमरावती या नावाने 2015 पासुन फर्म असुन सदर फर्मचे अंतर्गत मी शासकिय कंत्राट घेत असतो. पोलीस उपअधिक्षक श्री.षेळके साहेब यांना संपर्क करुन लाच मागणीबाबत तक्रार असल्याचे सांगीतल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम येथे येण्याकरीता सांगीतले होते. त्यामुळे दि.06.10.2023 रोजी मी ला.प्र.वि.कार्यालयात हजर आलो. भूमि अभिलेख कार्यालय वाशिम जि.वाशिम येथील दोन कर्मचारी पंच म्हणुन कार्यालयात हजर होते. मी माझी तक्रार पंचां समोर सांगितली. माझे शिक्षण हे इंग्रजी माध्यमातुन झालेले असल्यामुळे मला व्यवस्थीत मराठी लिहीता येत नसल्यामुळे पो.उप अधिक्षक शेळके यांचे सुचनेवरुन पोहवा नितीन टवलारकर यांनी मी सांगीतल्याप्रमाणे पंचासमक्ष तक्रार संगणकावर टंकलिखीत केली ती पुढीलप्रमाणे"मी शासकिय कंत्राटदार असुन माझी स्वराज्य इंजिनिअर्स अमरावती या नावाने 2015 पासुन फर्म असुन सदर फर्मचे अंतर्गत मी शासकिय कंत्राट घेत असतो. कार्यकारी अभियंता व्दार निर्मिती व उभारणी कार्यालय अमरावती अंतर्गत उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाशिम येथील उपविभागीय कार्यालयीन कामासाठी शिपाई व चौकीदार यांचे सेवा बाहय अभिकरणामार्फत पुरविण्याची निवींदा ऑक्टोबर 2022 मध्ये निघाली होती. सदर निविदा भरुन सादर केल्यामुळे माझे स्वराज्य इंजिनिअर्स अमरावती या फर्मला सदर कामाचे टेंडर मिळाले असुन त्याची वर्कऑर्डर माहे फेब्रुवारी 2023 मध्ये आम्हाला मिळाली. त्याप्रमाणे माझे फर्म मार्फत उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाषिम येथे 1 चौकीदार व 1 शिपाई पुरविण्यात आले आहे. सदर कार्यालयास पुरविण्यात आलेल्या शिपाई व चौकीदार यांचे माहे फेब्रुवारी ते जुन 2023 या कलावधीतील बिल निघाले आहेत. सदर कार्यालयाकडे माहे जुलै ते सप्टेंबर 2023 या कालावधीचे बिल प्रलंबित आहे. सदर बिल काढण्याकरीता मीं उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाशिम येथील कनिष्ठ अभियंता श्री.अजय कोल्हे यांना दि.28.09.2023 रोजी त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता श्री.अजय कोल्हे यांनी मला सांगीतले कि, तुमच्या कामाचे बिल रेकॉर्ड करुन मंजुरी करीता पाठविण्याकरीता 10,000/-रु दयावे लागतील,पैसे दिले तर तुमचे बिल लवकर मंजुरी करीता पाठवतो. मी त्यांना पैसे न दिल्यामुळे त्यांनी त्यांचे फेसबुक अकॉऊंटवर माझे नावाचा उल्लेख करुन बिल कसे रेकॉर्ड होते ते मी पाहतो असे दि. 05.10.2023 रोजी लिहीले होते. त्यामुळे मी दि.05.10.2023 रोजी त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता श्री.अजय कोल्हे यांनी मला सांगीतले कि, तुमच्या कामाचे बिल रेकॉर्ड करण्याकरीता 10,000/-रु दयावे लागतील,पैसे दिले तर तुमचे बिल लवकर मंजुरी करीता पाठवतो.नाहीतर तुमचे बिल काढणार नाही असे सांगीतले. बिल मंजुरी करीता पाठविण्याकरीता कुठलिही फि लागत नाहीत. मला सदर कार्यालयात पुरविलेले कर्मचारी यांचे पगार करावे लागत असल्याने त्याकरीता मला पैशाची आवश्यकता असल्यामुळे मी कनिष्ठ अभियंता श्री.अजय कोल्हे यांना 10,000/-रु देण्याचे नाईलाजास्तव कबुल केले आहे.सदर कामाच्या संबधाने मला मिळालेली वर्क ऑर्डरची झेरॉक्स प्रत तसेच श्री.कोल्हे यांनी माझे नावाचा उल्लेख करुन केलेल्या पोस्ट ची मी झेरॉक्स काढून मी सोबत आणलेली आहे. माझी श्री.अजय कोल्हे कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती

उपविभाग वाशिम यांना पैसे देण्याची इच्छा नाही. श्री.अजय कोल्हे कनिष्ठ अभियंता यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. श्री.अजय कोल्हे कनिष्ठ अभियंता यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनंती आहे.".अशी तक्रार दिली.तक्रार नोंदविल्यानंतर मला तसेच पंचाना तक्रार पडताळणी विषयी माहिती दिली.

सदर तक्रारीवरुन दि.06.10.2023 रोजी उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाशिम येथे मी पंच क्र.1 यांचे सह जावुन अजय कोल्हे कनिष्ठ अभियंता यांची भेट घेवुन पंचासमक्ष पडताळणी केली असता अजय कोल्हे यांचेसोबत भेट झाली. दरम्यान कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला म्हटले की " सांगण हिशोब कसा आहे तं.."त्यावर मी त्यांना "तुम्हालं तेच तं म्हणो..इथं हाये नं... कसं करता सांगा "असे म्हटले असता कोल्हे यांनी "कसं करता सांग" असे म्हटले.मी त्यांना "तुम्ही सांगा..म्हणजे किती दयायचे आहेत काय करु?तुम्ही सांगा "असे म्हटले.त्यांनी मला "तिन परसेंटचे" असे म्हटले असता मी त्यांना अरे बापरे असे म्हटले. असता त्यांनी मला "अणं याचं पण...कसं करतंत" असे म्हटले. मी त्यांना "तरी किती देउ " असे म्हटले असता कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला " काढणं आकडा तुच काढ अण मल दे ."असे म्हटले त्यावर मी त्यांना " तुम्ही सांगा "असे म्हटले असता त्यांनी मला "कितीचं होतं बिल ते" असे म्हटले. मी त्यांना "हो समजा तिन लाखाचं तं अण हे एक लाख..चार लाखांच" असे म्हटले असता कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला चार लाखाचे पाच परसेंट असे म्हटले. त्यावर मी त्यांना हं असे म्हटले. कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला " आता मिच रेकॉर्ड काढतोनं...हेच म्हणन हे अन तेच म्हणनं हे...आता याचे अर्धे अर्धे पैसे साहेबालं दे काही दे मलं पाच टक्के देत जाय..." असे म्हटले मी त्यांना मंग आता ते बिल पाठवजा मंग आता असे म्हटले असता कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला " हो पाठवतो नं..मी तुला काय करायचं मी रिस्क घेईन...रिस्क माही हायेनं " असे म्हटले. मी त्यांना " ते फेसबुकवर टाकत असते का? बर किती करु त्याचं सांगा..." असे म्हटले असता कनिष्ठ अभियंता कोल्हे यांनी मला "पाहयनं आता जे होते ते.." असे म्हटले असता मी त्यांना "तरी.. तरी अंदाजे एक आकडा " असे म्हटले असता कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला "त्याचे दहा हजार होतेत अण याचे समजा जे होते.." असे म्हटले त्यावर मी त्यांना ठिक हे.. करुन देतो मंग मी असे म्हटले.त्यावर कोल्हे कनिष्ठ अभियंता यांनी मला हो असे म्हणुन कार्यालयास पुरविण्यात आलेल्या शिपाई व चौकीदार यांचे माहे जुलै ते सप्टेंबर 2023 या कलावधीतील बिल काढण्याकरीता 10,000/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली. मी त्यांना येतो मी असे म्हणुन त्यांचे सोबत बोलत बोलत कार्यालयाचे बाहेर निघालो.सापळा कारवाई आजच करण्याचे ठरल्याने मी अजय कोल्हे यांचेविषयी कार्यालयातुन माहिती घेतली असता ते कार्यालयात हजर नसुन बाहेर निघुन गेले असल्याचे सांगीतले तसेच कार्यालयीन वेळ संपल्याने तसेच कोल्हे कनिष्ठ अभियंता हे परत कार्यालयात येईल याची खात्री नसल्याने व मला वैद्यकिय अडचण आल्यामुळे सापळा कारवाई सोमवार दि.09.10.2023 रोजी करण्याबाबत विनंती केल्यावरुन पोउपअधि गजानन शेळके यांनी सापळा कारवाई ही सोमवार दि.09.10.2023 रोजी आयोजीत करण्यात येणार असल्याबाबत ठरले. त्यानंतर त्यांनी परत दि.07.10.2023 रोजी फेसबुक वर माझे कामाचे संबंधाने चुकीची माहिती टाकल्याचे मला माहिती पडल्याने मी कोल्हे यांना संपर्क केला होता.

दि.09.10.2023 रोजी पोउपअधि शेळके यांनी मी ला.प्र.वि.कार्यालयात हजर न आल्यामुळे मोबाईल वर संपर्क केला असता मी सांगीतले कि, त्यांनी गै.अ.अजय कोल्हे यांचे विषयी माहिती घेतली असता ते आज वाशिम येथे कार्यालयात हजर नाही. ते मिटींग कामी विभागीय कार्यालय अमरावती येथे गेलेले आहेत.त्यामुळे त्यांची आज भेट होणार नाही. उदया दि.10.10.1023 रोजी कोल्हे साहेब हे वाशिम येथे कार्यालयात हजर राहतील तिथे त्यांचे भेट होईल असे फोनव्दारे सांगीतले.

दि.10.10.2023 रोजी गै.अ.अजय कोल्हे कनिष्ठ अभियंता यांची उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाशिम येथे पंच क्र.1 यांचे सह जावुन भेट घेतली असता भेटी दरम्यान मी, गै.अ.कोल्हे साहेब यांना माझे कामा विषयी बोललो असता त्यांनी तु अगोदर वॉचमन लाव, अगोदर लावलेला वॉचमन चार महिण्यात सोडुन गेला आहे तो परत येत नाही म्हणतो, तु फक्त शिपाई लावलेला आहे, वॉचमन लावावा लागेल, तेव्हा मी गै.अर्ज.कोल्हे साहेब यांना तुम्ही सांगीतल्याप्रमाणे पैसे आणले आहे माझे काम करा असे म्हणुन खीशातील रक्कम काढुन त्यांच्या समोर केली असता त्यांनी मला पैसे पाहिजे नाही, त्याची गरज नाही मला दोन लाख रुपये पगार आहे, तु फक्त वॉचमन लाव असे म्हणत राहीले त्यावर मी त्यांच्या टेबलवर रक्कम ठेवली परंतु त्यांनी त्या रक्कमेला हात ही न लावता मला पैसे पाहिजे नाही त्याची गरज नाही असे नाराजीनेच म्हटले.त्यांनी माझे कडुन लाच रक्कम स्विकारली नसल्याने कुठलाही इशारा न करता मी कार्यालयाचे बाहेर निघुन ला.प्र.वि.कार्यालय येथे

पंचासह परत आलो.

पोउपअधि शेळके यांचे सुचनेवरुन तक्रारदार यांना आलोसे अजय कोल्हे यांचा फोन आला किवा कोणत्याही प्रकारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला तर आपण परत सापळा कारवाई आजमावु असे सांगुन गोपणीयतेच्या सुचना दिल्या.

दि.30.10.2023 रोजी मी लाप्रवि कार्यालयात हजर झालो.त्यानंतर पोउपअधि शेळके सांहेब यांनी दोन्ही पंचाना बोलावुन घेतले. त्यांनी परत सापळा कारवाई आजमावीण्यात येत असल्याचे सांगुन मला लाचरक्कमेसह पंच क्र.01 सह कोल्हे यांचे कार्यालयात पाठविले असता कोल्हे हे कार्यालयात हजर होते मी त्यांना म्हटले की तुम्ही मलं सांगीतलं ते करुनच राहीलो तेतं रेडी आहो बॉ.. असे म्हटलो असता त्यांनी मला वॉचमेंनच्या पेमेंटविषयी विचारले व जास्त बोलणी न करता मला बोलण्याचे टाळुन त्याठिकाणा वरुन निघुन गेले.त्यांनी माझे कडुन लाच रक्कम स्विकारली नसल्याने कुठलाही इशारा न करता मी कार्यालयाचे बाहेर निघुन ला.प्र.वि.कायलिय येथे पंचासह परत आलो.

दि.10.10.2023 नंतर अजय कोल्हे यांचा मला फोन आला नाही. मी त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद आला होता. दि.06.10.2023 रोजी कोल्हे यांनी 10,000/-रु मागीतले होते. त्यांना लगेच पैसे मिळतील अशी अपेक्षा होती परंतु तेंव्हा त्यांना मी लगेच पैसे दिले नाही.त्यामुळे अजय कोल्हे यांना माझा संशय आला असावा त्यामुळे ते माझेकडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत त्यामुळे आपण आपली पुढील कारवाई करावी असे पोउपअधि शेळके यांना सांगीतल्याने पंचासमक्ष माझा जबाब नोंदविला.त्यांनतर पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी अजय कोल्हे यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेवुन ला.प्र.वि कार्यालय वाशिम येथे आणले. अजय कोल्हे हे कनिष्ठ अभियंता नसुन सहायक अभियंता आहेत.

अजय विश्वनाथ कोल्हे, वय 45 वर्षे, सहायक अभियंता,उप अभियंता यांत्रिकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती, उपविभाग वाशिम. रा. प्लॉट नं.30 नविन आयुडीपी सिव्हील लाईन वाशिम.यांनी स्वतःचे आर्थिक फायद्या करीता लोकसेवक या पदाच्या नात्याने आपल्या पदाचा गैरवापर करुन दि.06.10.2023 रोजी 14.08 ते 14.25 वा चे दरम्यान उप अभियंता यात्रिंकी उच्चालक उभारणी व दुरुस्ती उपविभाग वाशिम येथे पडताळणी दरम्यानझालेल्या संभाशणामध्ये गै.अ.अजय कोल्हे यांनी मला माझे फर्म मार्फत कार्यालयास पुरविण्यात आलेल्या शिपाई व चौकीदार यांचे माहे जुलै ते सप्टेंबर 2023 या कालावधीतील बिल काढण्याकरीता 10,000/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. म्हणुन त्यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद पोहवा नितीन टवलारकर यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.अशा फिच्या जबानीरिपार्ट सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास मे.पोनी सा यांचे आदेशाने पोउपअधि गजानन शेळके ला.प्र,वाशिम यांचेकडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Devidas Bapurao Zunge
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** GAJANAN TUKARAM
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH82861

स्टे.डा.अंमलदार
पो.स्टे.वाशिम (शहर)